महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १२७ वा | दिनांक : १२/०२/२०२५ | वार : बुधवार

# मनोज जरांगे जी गाडी वापरतात ती गाडी वाळू माफियांची - लक्ष्मण हाके





**पुणे :** मनोज जरांगे जी गाडी वापरतात ती गाडी वाळू माफियांची असल्याची टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे. जरांगे पाटलांच्या आंदोलनाला ज्या वाळू माफियांचा पाठिंबा होता, त्यांचा सपोर्ट घेणे न घेणे हे कायदा सुव्यवस्था बघून घेईल. वाळू कोणी ओढावी, कायद्याचा भंग कोणी करावा, महसूल कोणी बुडवावा आणि जे बुडवतील त्यांना कायदा बघून घेईल. परंतु या अशा माफियांच्या जोरावर आंदोलन उभे करून या महाराष्ट्रातल्या ओबीसींच्या आरक्षणामध्ये घुसखोरी करत असतील तर मला असे वाटते की खूप मोठे पातक या लोकांकडून घडले असल्याची टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे.

तसेच पुढे बोलताना लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली आहे की त्यांनी केवळ महसूलाच्याच नव्हे तर ओबीसी आरक्षणाच्या विरोधात जे काही षड्यंत्र या महाराष्ट्रात रचले गेले, दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचे कार्य या लोकांकडून झाले, या लोकांना कठोर शिक्षा झाली पाहिजे आणि यांच्या मागे हे षड्यंत्र रचणारा जर सुरेश धस यांच्या भाषेत बोलायचे झाले तर यांचा आका कोण होता, याचा शोध घेतला पाहिजे.

लक्ष्मण हाके म्हणाले, वाळू उपसा करणारे, महसूल बुडवणारे, गोदावरी नदीची चाळण करणारे यांना काय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमंत्रित करतात का, तुम्ही अशी वाळू ओढा म्हणून? त्यामुळे मला असे म्हणायचे आहे की या लोकांना शिक्षा झाली पाहिजे. मनोज जरांगे पाटील यांच्या मागे जर हे गुंड आणि फक्त वाळू माफियांपुर्त मर्यादित नाही. बीड शहर ज्यावेळी जाळले जात होते त्यावले आंतरवालीसराटीमध्ये गोळीबार करणारी माणसे यांना मोक्का पेक्षाही मोठा गुन्हा यांच्यामध्ये दाखल होता. त्यामुळे फक्त तडीपारीची कारवाई करून चालणार नाही.

पुढे बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, माझे एवढेच म्हणणे आहे की ओबीसी आरक्षणात घुसखोरी करू नका. त्यांना जे काही १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे त्याला ओबीसीने कुठे विरोध केला आहे. ओबीसीचे एवढेच म्हणणे होते की तुम्ही ओबीसीमध्ये घुसखोरी करू नका आणि जर तुम्ही घुसखोरी केली तर ओबीसी आरक्षण संपेल, ही न्याय्य मागणी होती. तसेच ज्या ज्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी ओबीसींच्या आरक्षणाचा मुद्दा उचलून धरला आहे त्या लोकांवर याच लोकांनी हल्ले केले आहेत. ज्या लोकांवर तडीपारीची कारवाई झाली त्याच लोकांनी माझ्यावर पुण्यात येऊन हल्ला केला आहे. त्यामुळे त्यांना केवळ वाळूबद्दल कारवाई नव्हे तर मकोका अंतर्गत कारवाई व्हायला पाहिजे, अशी मागणी यावेळी लक्ष्मण हाके यांनी केली आहे.

लक्ष्मण हाके यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्यावर देखील टीका केली आहे. ते म्हणाले, सुरेश धस यांचा खरा जातीवादी चेहरा समोर आला आहे. सुरेश धस ज्या ओबीसींच्या मतांवर निवडून येतात त्या ओबीसींच्या विरोधात गरळ ओकणारे सुरेश धस. सुरेश धस यांनी ज्यावेळी निवडून आले तेव्हा विजयाचा गुलाल घेऊन ओबीसीच्या नेत्यांवर माझेही नाव घेऊन गरळ ओकली. त्यामुळे सुरेश धस यांचा खरा जातीवादी चेहरा समोर आलेला आहे. पुढे लक्ष्मण हाके म्हणाले, सोमनाथ सूर्यवंशी यांचा खरा मारेकरी जे आहेत त्या लोकांवर कारवाई करू नये असे सुरेश धस म्हणूच कसकाय शकतात? त्यामुळे सुरेश धस यांच्या डोक्यावर इलाज करण्याची गरज आहे असे मला वाटते.

पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या मुंडे समर्थक एकत्र आले तर स्वतंत्र पक्ष तयार होईल. यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता लक्ष्मण हाके म्हणाले, पंकजा मुंडे एका पक्षाच्या वरिष्ठ नेत्या आहेत. त्यांनी के करावे आणि काय करू नये यापेक्षा आज घडीला ओबीसीच्या लढाऊ नेत्याची गरज आहे. ओबीसीची विचारधारा असणारा एक पक्ष निर्माण होण्याची गरज आहे. नाहीतर सुरेश धस सारखा माणूस ओबीसींचीच मते घेतो आणि विजयी सभेमधून सांगतो 'आरे हाके मला धनगरांनी एवढी मते दिलीत. त्याच धनगरांची बिंदु नियमावली, त्याच धनगरांच्या शिक्षकांसंदर्भात महिनाभरात गरळ ओकतो. त्यासाठी या महाराष्ट्रात ओबीसींचा एक पक्ष असणे गरजेचे आहे. त्यामुळे सुरेश धस सारख्या लोकांना धडा शिकवता येईल.

# सोलापूरकरविरुद्ध रिपाइंचे आक्रमक आंदोलन




**पुणे :** अभिनेता राहुल सोलापूरकर यांच्याविरुद्ध रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) ने मंगळवारी त्यांच्या निवासस्थानाबाहेर तीव्र आंदोलन केले. छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे सोलापूरकर वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

रिपाइंचे प्रदेश संघटन सचिव परशुराम वाडेकर यांनी सांगितले की, राजर्षी शाहू महाराजांची भूमिका साकारलेल्या सोलापूरकर यांना डॉ. आंबेडकरांचे महत्त्व माहीत असूनही ते जाणीवपूर्वक वादग्रस्त विधाने करत आहेत. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोलापूरकर यांच्यावर अॅट्रॉसिटी आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून तात्काळ अटकेची मागणी केली.

शहराध्यक्ष संजय सोनवणे यांनी सोलापूरकर यांचे पोलीस संरक्षण काढून घेण्याची मागणी केली. महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या सोलापूरकर यांना पोलीस कोठडीत टाकावे, अशी मागणीही त्यांनी केली.

आंदोलनात रिपाइंचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. यामध्ये शैलेंद्र चव्हाण, असित गांगुर्डे, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, महिपाल वाघमारे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता. सर्व आंदोलकांनी सोलापूरकर यांच्या वक्तव्यांचा तीव्र निषेध केला आणि कठोर कारवाईची मागणी केली.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ फेब्रुवारी २०२५


# मागासवर्गीयांची घरे तोडणाऱ्यांवर गुन्हे दाखल



**मुंबई** : पवईच्या जयभीम नगरमधील जवळपास ६५० मागासवर्गीय परिवारांवर ६ जून २०२४ रोजी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी, पोलिस, बिल्डर निरंजन हिरानंदानी व स्थानिक आमदार यांनी संगनमताने बेकायदेशीर कारवाई केली. पोलिसांनी घरात घुसून लहान मुले, गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिक यांना मारहाण करत जबरदस्तीने घरांवर बुलडोझर चालवून त्यांना बेघर केले. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने बीएमसी अधिकारी, पोलिस, बिल्डरवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जयभीम नगरमध्ये मागील २५ ते ३० वर्षांपासून जवळफास 650 मागासवर्गीय परिवार राहत होते. तेथे राहणाऱ्या मुलांचे शिक्षण तेथेच आजूबाजूच्या शाळा, महाविद्यालयामध्ये सुरू असताना भर पावसात बीएमसी एस विभागाचे अधिकारी, पवई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे यांच्यासह शेकडो पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच विकासक हिरानंदानी आणि स्थानिक आमदारांनी हातमिळवणी करून ६५० परिवारांना बेघर केले. त्यानंतर बिल्डर निरंजन हिरानंदानी यांनी आपल्या गुंडांचा वापर करून रातोरात तेथे चारही बाजूला पत्रे लावून सहा एकर (२४००० sq. meter) जागेचा ताबा घेतला. बेघर झालेले ६५० मागासवर्गीय परिवार निवारा नसल्यामुळे आजूबाजूच्या फुटपाथवर उघड्यावर रहात आहेत.

माजी मंत्री व प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष मो. आरिफ नसीम खान यांनी या बेघर झालेल्या सर्व रहिवाशांना सोबत घेऊन राज्याचे तत्कालीन महामहीम राज्यपाल रमेश बैस व विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भेट घेऊन घटनेची सविस्तर माहिती दिली होती. तसेच तत्कालीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पत्राद्वारे झालेल्या घटनेची माहिती देऊन कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर एका पिडीताने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने सह पोलिस आयुक्त (गुन्हे) व अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) यांच्या नेतृत्वाखाली SIT गठित करून अहवाल मागविला होता. SIT ने सखोल चौकशी करून अहवाल सादर केला व त्या अहवालामध्ये नियमबाह्य कारवाई झाल्याचे सिद्ध झाले. SIT ने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाने SIT ला सर्व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते.

न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्याने फिर्यादीने पुन्हा न्यायालयात दाद मागीतल्यावर SIT क्राइम ब्रँच मार्फत मनपाचे उपायुक्त बिरादर, मनपा एस विभाग सहायक पालिका आयुक्त कसगीकर, मनपा अधिकारी आमिष बागडे, पंकज तसेच पोलिस उपायुक्त मंगेश शिंदे, पवई पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सोनवणे आणि हिरानंदानी बिल्डर्सचे संजय पांडे, अर्जुन व इतर लोकांवर १० फेब्रुवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






# राज्य महिला आयोग जन सुनावणीस उपस्थित राहण्याचे आवाहन




**कन्नड (अरुण थोरात)** : राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर दि. १४ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर येथे जनसुनावणी घेणार असल्याने कन्नड तालुक्यातील महिलींनी आपल्या काही तक्रारी असल्यास उपस्थित राहण्याचे अवाहन महिला बालविकास विभाग कन्नड यांच्या वतीने करण्यात आले आहे.महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालय मुंबई येथे असल्याने, राज्यतील अनेक महीलांना मुंबई येथे पोहोचणे शक्य होत नाही, महीलांना त्यांच्या तक्रारी बाबद स्थानिक पातळीवर, त्यांच्या तक्रारी मांडण्याकरीता 'महिला आयोग आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे दि. १४फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वाजता जिल्हा नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय संभाजीनगर येथे जनसुनावणी घेण्यात येणार आहे, जनसुनावणी साठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर उपस्थित राहणार आहेत.

तरी कन्नड तालुक्यातील कोणतीही तक्रारदार पिडीत, महिला कोणतीही पुर्वसुचना न देता थेट येऊ शकतात. जनसुनावणीस उपस्थित राहुन लेखी, तक्रारी आयोगापुढे मांडु शकतील, तरी या जनसुनावणी साठी कन्नड तालुक्यातील जास्तीत जास्त तक्रारदार पिडीत महिलांनी उपस्थित राहुन समस्या मांडाव्यात. असे आवाहन तालुका संरक्षण अधिकारी हर्षल पाटील, महिला बालविकास विभाग अभय केंद्र कन्नड यांनी केले आहे.

# कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**नाशिक** : नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाद्वारे देण्यात येणारे कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झालेत. कवी अमिताभ गुप्ता आणि नीलिमकुमार यांना या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, नाशिकमध्ये उद्या (बुधवार, १२ फेब्रुवारी) रोजी गौरव करण्यात येणार आहे, अशी माहिती कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी दिली.

विष्णू वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज नाशिकचे. त्यांच्या स्मरणार्थ नाशिक येथे कुसुमाग्रज प्रतिष्ठान नावाची संस्था उभारण्यात आली आहे. कुसुमाग्रजांच्या टिळकवाडी येथील निवासस्थानी सुसज्ज ग्रंथालय असून, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाद्वारे कुसुमाग्रज पुरस्कार देण्यात येतात.

बंगाली भाषेतील प्रसिद्ध कवी अमिताभ गुप्ता यांना २०२२ सालचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. आसामी भाषेतील प्रसिद्ध कवी नीलिमकुमार यांना २०२३ चा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराच्या निवड समितीचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी, अनुवादक चंद्रकांत पाटील यांनी काम पाहिले.

कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार समारंभाचे नाशिकमधील मु. शं. औरंगाबाद सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यस्थानी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे असतील. यावेळी प्रमुख प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, चंद्रकांत पाटील यांची विशेष उपस्थिती असेल. कार्यक्रमाला साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे आणि कुलसचिव दिलीप भरड यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ फेब्रुवारी २०२५


## रा.रं. बोराडे वास्तवातले ग्रामीण साहित्यिक, साहित्य विश्वात पोकळी - अशोकदादा गरुड




**कन्नड (अरुण थोरात):** ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे गेल्याने साहित्य विश्वात मोठी पोकळी निर्माण झाल्याचे प्रतिपादन अशोकदादा गरुड यांनी केले. ते ज्ञानविकास विद्यालय भराडी येथे आयोजित श्रध्दांजली सभे प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, अल्पवयामध्येच इयत्ता दहावीला असताना लिखाण सुरू करणारे साहित्यिक, मराठवाड्याच्या शेवटच्या टोकाला असलेले लातूर, तर सुरुवातीला असलेले छत्रपती संभाजीनगर अशी भौगोलिक व्याप्ती साहित्यात रूपांतर करणारे श्री.बोराडे. नाटक, तत्त्वज्ञान, कथा, कादंबऱ्या, समीक्षा, कथाकथन, परिसंवाद आदीबाबत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, ग्रामीण साहित्य चळवळीला गती देणारे साहित्यिक म्हणून मनाला भावतात. आमदार सौभाग्यवती, नामदार सौभाग्यवती आशा दोन पुस्तकांची निर्मिती करून, नाट्यरूपांतर, चित्रपटात रूपांतर करणारे ग्रामीण लेखक राज्यकर्त्यांनाही भावतात. स्त्रियांचा आदर:- पत्नी सुलभा व इतर नाती गोती. मुलीचा जन्मदर वाढावा ही बाब लेखनातूनच नव्हे तर अरुणा, कल्पना, प्रेरणा, मंजुषा या चार मुलींच्या माध्यमातून संसारात समाधान मानणारे वास्तव साहित्यिक.बुरुज कादंबरीनेही अनेकांची बुरुज उभे केले.

देवगिरी विद्यालयात प्राचार्य असताना अनेक विद्यार्थ्यांना व महाविद्यालयाला वेगळ्या उंचीवर नेण्याचा मानस बोराडे सरांचा. अशा विविध व सर्वांगीण कार्याची दखल घेत, उत्कृष्ट वांग्मय निर्मितीचा राज्य पुरस्कार सलग पाच वेळा व अनेक पुरस्काराने सन्मानित होणारे रा.रं. बोराडे नवोदित लेखकांसाठी प्रेरणा देणारे. हाडाचे साहित्यिक कसे असावे, तर बोराडे सरांसारखे, काल-परवापर्यंत साहित्य चळवळीमध्ये काम करणाऱ्या साहित्यिकांना नातीगोती मानत दु:खद कालावधीमध्ये वयाच्या ८५ व्या वर्षीही संवाद बोराडे साधत होते, साहित्यिक कार्यक्रमांना बळकटी देत असलेले सहृदय लेखक असल्याचे मनोगत अशोकदादा गरुड यांनी भराडी येथील ज्ञान विकास विद्यालयात केले.

## प्रा. अरूण आहेर यांना पीएचडी प्रदान.



**जालना ता. ११ (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** टेंभुर्णी येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.अरूण आहेर यांना भोकरदन येथील मोरेश्वर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शिवाजीराव सांगोळे यांच्या मार्गदर्शनाखालील हिंदी विषयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत "कबीर से लेकर तुकाराम " (नरेंद्र मोहन के नाटकों की प्रगतीशील चेतना का अनुशीलन) या विषयावर पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

प्रा. डॉ.अरुण अहेर यांचे या यशाचे बद्दल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री संजयजी काबरा उपाध्यक्ष शेख जमीर सर ,सर्व पदाधिकारी , तसेच प्राचार्य श्री. एन बी काळे सर्व व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. मराठी विषय महासंघाचे राज्य समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे. जुक्टा संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुग्रीव वासरे, प्रा. डॉ.अरुण आहेर यांचे टेंभुर्णी येथील पत्रकार श्री.राणा अंभोरे , ॲड.किशोर गायकवाड. यांनी कौतुक असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मास कॉपी होणाऱ्या परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द होणार

**मुंबई :** दहावी व बारावी बोर्डाच्या परीक्षेत एखाद्या केंद्रावर मास कॉपी अर्थात सामूहिक कॉपी करण्याचा प्रकार घडला तर त्या केंद्राची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेत. एवढेच नाही तर विद्यार्थ्यांना कॉपी करण्यासाठी मदत करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिलेत. या निर्देशामुळे या परीक्षा कॉपीमुक्त होण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व पोलिस अधिकाऱ्यांकडून परीक्षेच्या तयारीचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी उपरोक्त आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह इतर मंत्री उपस्थित होते. यावेळी शिक्षक विभागाने दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत ५ हजार १३० केंद्रांवर होणार असल्याचे नमूद करत यासंबंधीची सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती दिली.

त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षण विभागासह पोलिस प्रशासनाला विविध सूचना केल्या. ते म्हणाले, परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देताना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत, याची खबरदारी घ्या. भरारी पथकांद्वारे कॉपीमुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षीत आहे, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, सर्वच परीक्षा केंद्रांवर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष बैठ्या पथकांची नियुक्ती केली जावी. या पथकाने परीक्षा सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचावे. त्यानंतर परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत स्थितीवर नियंत्रण ठेवावे. विशेषतः संवेदनशील केंद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठ्या पथकांत नियुक्ती केली जावी. तसेच अशा परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे व व्हिडिओ कॅमेऱ्यांद्वारे पूर्णवेळ निगराणी करावी. सर्व तालुक्यांतील परीक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन व व्हिडिओ कॅमेरे कार्यरत असावेत. तसेच यावर निगराणी ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्यासाठी एक विभागप्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी.

बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या खांद्यावर संयुक्तपणे राहील. शहरी भागात पोलिस आयुक्त व महापालिका हद्दीत आयुक्त ही जबाबदारी पाहतील. इंग्रजी भाषा, गणित व विज्ञान विषयाच्या परीक्षेच्या दिवशी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवेदनशील केंद्रांना स्वत: भेटी द्याव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

दुसरीकडे, बारावीच्या ११ फेब्रुवारी ते १८ मार्चपर्यंत होणाऱ्या परीक्षेसाठी राज्यभरातील १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यात ८ लाख १० हजार ३४८ विद्यार्थी, तर ६ लाख ९४ हजार ६५२ विद्यार्थिनी आहेत. यंदा ३७ तृतीयपंथीही परीक्षेसाठी बसले आहेत. या पैकी ७ लाख ६८ हजार ९६७ विद्यार्थी विज्ञान शाखेची परीक्षा देणार आहेत. ३ लाख ८० हजार ४१० विद्यार्थी कला शाखेची तर ३ लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी वाणिज्य शाखेची परीक्षा देणार आहेत. बोर्डाने ही परीक्षा 'कॉपीमुक्त' करण्यासाठी २७१ भरारी पथकांची नियुक्ती केली आहे.

सर्व परीक्षार्थ्यांना परीक्षेच्या अर्धा तास आधी केंद्रावर हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांना १० मिनिटे वाढवून दिले जाणार आहेत. यापूर्वी पेपरच्या अगोदर १० मिनिटे वाढवून दिले जात होते, परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे यांच्यावर देखील पात्र आणि अजामीन पात्र गुन्हा दाखल केला जाणार आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर ड्रोन कॅमेराद्वारे निगराणी ठेवली जाणार आहे. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळल्यास संबंधित केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जाणार आहे. तसेच प्रश्नपत्रिका फुटू नये म्हणून जीपीएसद्वारे लाइव्ह ट्रॅकिंग, व्हिडिओ चित्रीकरणही केले जाणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १२ फेब्रुवारी २०२५


## आधी मी कवितेला सांभाळले, आता कविता मला सांभाळतेय- अजीम नवाज राही




**कन्नड (अरुण थोरात):** आज या यशस्वी, प्रसन्न वळणावरून मागे वळून बघतांना सारं, सारं स्वप्नासाररखं वाटतं, इयत्ता १० वी ११ ते महाराष्ट्र राज्याच्या ११ विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात कवितांचा समावेश, मानसन्मान,पुरस्कार अगदी शब्दयात्रेची झोळी शिगोशिग भरून ओसंडली, ज्या घरात जन्मलो त्या घराला कसला शिक्षणाचा, पुस्तकाचा वसा,वारसा, मिठभाकरीच्या तजविजीसाठी वडिलोपार्जित ढोरमेहनतीचे सटरफटर व्यवसाय, रोजगार भटकंतीने भरभरून दिलं, माणूसवाचन झालं, जंगलवाचन झालं, रोजगाराच्या सगळ्या शक्यता जेंव्हा मावळल्या तेंव्हा वाणी दिमतीला आली, वक्ता, निवेदक म्हणून सुरू झाली राज्यभराची भटकंती, आधी मी कवितेला सांभाळले, आता कविता मला सांभाळत आहे. भोवतालाने भरभरून दिले, अनुभवाची उसनवारी करण्याचं, कल्पनांच्या भराऱ्या मारण्याचं काम पडलं नाही, सुचलेलं नाही,बोचलेलं कवितेत मांडण्याची वस्तुनिष्ठ सवय लेखणीला जडली असे चिंतनीय प्रतिपादन प्रख्यात मराठी कवी, नामवंत वक्ते, निवेदक अजीम नवाज राही यांनी केले,दि. ११ फेब्रुवारी रोजी कन्नड शहरातल्या स्व पूर्णाकाकु कोल्हे महिला प्रबोधनी सभागृहात स्व फुलसिंग दगडू केवट यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त आयोजित, मी आणि माझ्या शब्दप्रवासातली संघर्षशील वळणे या विषयावर आयोजित व्याख्यानात अजीम नवाज राही बोलत होते, व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष संतोष कोल्हे होते, प्रमुख अतिथी म्हणून नवोदयचे प्राचार्य पंकज देशमुख, विभागीय शिक्षण मंडळाचे सदस्य सागर जाधव, शिक्षसेनेचे राज्य सरचिटणीस दिपक पवारएँड प्रसन्ना पाटील, प्रा. शिवाजी हुसे,संपतराव केरे, डॉ.रमेश सूर्यवंशी, नगरसेवक रत्नाकर पंडित, संतोष निकम, सुधाकर देवकर, प्रा.अरविंद कांबळे, प्रा.रंगनाथ लहाने, बी एल कुंभकर्ण, ब्राम्हणकर, डॉ.यशवंत पवार, नवले आप्पा, यांची उपस्थिती होती. आपल्या मनोगतात अजीम नवाज राही पुढे म्हणाले की आपण ज्या हवेत जगतो ती हवा निर्मितीत वाहिली पाहिजे, वरचा टरफल भाजल्याशिवाय आतला दाणा चवदार होत नाही, सगळ्या क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल घडले, साहित्यक्षेत्र त्याला अपवाद नाही, वर्तमानातले प्रश्न,वर्तमानातली आव्हाने निर्मितीत प्रतिबिंबित झाली पाहिजे, माणसाने भाषा घडविली, आता माणूस घडवण्याचं काम भाषेवर येऊन ठेपलं आहे, अख्ख्या जगाचं एक ग्लोबल खेडं झालं आहे. पूर्वीच्या अडचणी आता राहिल्या नाहीत, सकारात्मकता असली की सगळं मनासारखं घडतं, संवादीची, प्रसिद्धीची सगळी आयुधे माणसाच्या ताब्यात आली आहेत, तिचा विनियोग कसा करायचा हे माणसावर अवलंबून आहे, महानगरीय वचक, महानगरीय प्राबल्य आता संपुष्टात आले,ग्रामीण परिसरात खरी प्रतिभा अंगोपांगी फुललत आहे,डेरेदार होत आहे, यशाची, किर्तीची, प्रसिद्धीची क्षितिजे कवेत घेत आहेत, न्यूनगंड मनातून खरवडून टाकण्याचा, भरारी घेण्याचा काळ आहे, नकारात्मकता सुवर्णसंधीचं सोनं होऊ देत नाही याचे डोळस भान असले की प्रवास सुकर होतो हे मनावर बिंबवलं पाहिजे, आपल्याबिकट, खडतर, संघर्षशील जडणघडणीच्या प्रवासाच्या रेशीमगाठी उलगडतांना अनेक विनोदी किस्से सांगून अजीम नवाज राही यांनी श्रोत्यांना खळखळून हसवलं, साध्यासोप्या भाषेतल्या त्यांच्या मनोगताने वाक्यागणिक टाळ्या एकवटल्या, तब्बल अडीच तास ओघवत्या, रसाळ, मधाळ शैलीच्या माध्यामातून अजीम नवाज राही यांनी व्याख्यानावर घेतलेली पकड समारोपीय वळणापर्यंत कायम राहिली, श्रवणसौख्याच्या रिमझिमीत श्रोत्यांना चिंब भिजवत राहिली. यावेळी कालिदास उपासनी, संजय जाधव, धैर्यशील केरे, अनिल कोल्हे, सचिन आहेर, नितीन पाटील, सचिन पुरी, राकेश निकम यांसह शिक्षक, पत्रकार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालनसंजय जाधव ,सचिन आहेर आणि यांनी केले.

## मुख्यमंत्री मंत्रिमंडळ बैठकीत संतापले : पालक सचिवांच्या कामगिरीवर नाराजी

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक पार पडली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस संतप्त झाल्याचे दिसून आले. मंत्री धनंजय मुंडे हे या बैठकीला अनुपस्थित होते. अनुपस्थितीचे कारण म्हणजे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मंत्रिमंडळ बैठकीतच त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली होती. त्यामुळे धनंजय मुंडे बैठकीला आले नसल्याचे बोलले जात आहे.

मंत्री धनंजय मुंडे मंत्रिमंडळ बैठकीला अनुपस्थित होते. डोळ्याचे ऑपरेशन झाल्यामुळे बैठकीला उपस्थित नव्हते, असे स्पष्टीकरण त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आले आहे. बैठकीच्या सुरुवातीलाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केला. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पालक सचिवांना महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. राज्यातील रायगड आणि नाशिक येथे पालकमंत्री अद्याप नेमण्यात आला नसला तरी पालक सचिवांची निवड करण्यात आली आहे. पालक सचिवांच्या कामगिरीवर फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

राज्यात पालकमंत्री पदावरून वाद सुरू असला तरी प्रत्येक जिल्ह्यात पालक सचिवांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच पालक सचिवांना जिल्ह्यात जाऊन कामकाजाचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सूचना दिल्या असूनही अनेक पालक सचिवांनी जिल्ह्याचा दौरा केला नाही व कामकाजाचा आढावा देखील घेतला नाही. यामुळे मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

मंत्रिमंडळ बैठकीच्या सुरुवातीलाच मुख्यमंत्री या विषयावरुन संतप्त झाले होते. तसेच, तत्काळ सर्व पालक सचिवांनी त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन बैठका घेण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे, पुढील काही दिवसांत आता प्रत्येक जिल्ह्यात पालक सचिव जाऊन तेथील कामकाजाचा आढावा घेतील अशी अपेक्षा आहे.

## डीपीसीच्या बैठकीला फक्त मंत्र्यांनाच बोलावले



**मुंबई :** आज रायगड आणि नाशिक येथे पालकमंत्री नाहीयेत, तिथे येताना वरिष्ठ पातळीवर मुख्यमंत्र्यांचे आणि उपमुख्यमंत्र्यांचे असे ठरले की तिथल्या फक्त मंत्र्यांनाच बोलवायचे. कारण ही डीपीसी आहे. याच्यामध्ये पुढच्या वर्षी आपल्याला वर्षभरात किती कोटी रुपये त्या जिल्ह्याला द्यायचे ते ठरते. हे कसे ठरते? तिथल्या भौगोलिक क्षेत्र, किती लोकसंख्या, तिथला पर कॅपिटा उत्पन्न, मानव विकास निर्देशांक, अशा सगळ्या गोष्टी आपण एकत्र करतो आणि त्या पद्धतीने ठरवतो. मात्र मुंबई राजधानी आहे, नागपूर उपराजधानी आहे म्हणून यांना आपण झुकते माप देतो. इथे अधिकचा निधी द्यावा लागतो, असे अजित पवार म्हणाले.

पुढे बोलताना अजित पवार यांनी माध्यमांवर निशाणा साधला. अजित पवार म्हणाले, बातम्या पहिल्या तर रायगडच्या एकाही आमदाराला बोलावले नाही. अरे पण बोलावलेच नव्हते. बैठकीला मी तिथे दोन्ही मंत्री म्हणजे भरत गोगावले आणि अदिती तटकरे यांनाच बोलावले होते. पालक सचिव असतात, जिल्हाधिकारी असतात, मुख्य कार्यकारी अधिकारी असतात, डीपीओ असतात. हे काहीही बघायचे नाही आणि बातम्या सुरू करायच्या. ही डीपीसीची बैठक जिल्ह्याचा वार्षिक आराखडा बनवण्याची बैठक होती. यात साधारण तुम्हाला इतका निधी देणार आहोत आणि या निधीतला तुम्हाला २० टक्केच्या निधीचा तर आम्ही बंधनच घातले आहे की ही रक्कम अशी अशी खर्च केली पाहिजे.

अजित पवार म्हणाले, यंदाच्या वर्षी मी ठरवले आहे की १ टक्का डीपीसीची दिव्यांगांसाठी खर्च करण्यासाठी सांगितले आहे. आपल्याकडे १९ टक्के होते, ते कसे होते ५ टक्के महसूलाला होते, ५ टक्के शिक्षणाला होते, ५ टक्के नावीन्यपूर्ण योजनेला होते, ३ टक्के गृहला होते, असे १८-१९ टक्के होते. आणि आज २० टक्क्यांची ऑर्डर काढली म्हणजे एक टक्क्याकही त्यात दिव्यांगांसाठी वाढ केली आहे. त्यांनाही डीपीसीच्या माध्यमातून काही गोष्टी करायच्या असतील तर ते करू शकतात.

पुढे बोलताना अजित पवार यांनी आलमट्टीवर देखील भाष्य केले आहे. अजित पवार म्हणाले, या संदर्भात काही चुकीच्या बातम्या देण्यात आल्या आहेत. मात्र यावर आज मंत्रिमंडळ बैठकीत आमची चर्चा झाली आहे. आलमट्टीची ऊंची वाढवताना कोल्हापूर आणि सांगली या दोन्ही जिल्ह्यांना बॅक वॉटरची अडचण होणार नाही अशा पद्धतीची आपली भूमिका आहे. यात आम्ही बारकाईने लक्ष ठेऊन आहोत.

पालकमंत्री पदावर बोलताना अजित पवार म्हणाले, हा निर्णय अंतिमतः मुख्यमंत्री महोदय घेतील. तो सर्वस्वी हा त्यांचा निर्णय असतो. कोणाला पालकमंत्री करायचे, कोणाला कोणते खाते द्यायचे हा सर्वस्वी राज्याच्या प्रमुखांचा निर्णय असतो. मुख्यमंत्री महोदय यांच्या हे चांगले लक्षात असल्याचे अजित पवार यांनी सांगितले आहे.